# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः12.10.2024** **वारःशनिवार**

---

1. पूर्व आशियाई देशांच्या शिखर परिषदेची सांगता, दोन दिवसांच्या लाओ दौऱ्यानंतर पंतप्रधान मायदेशी परतले.
2. चालू आर्थिक वर्षात प्राप्तीकर विभागाकडे प्रत्यक्ष करापोटी 13 लाख 57 हजार कोटी रुपये जमा
3. विजयादशमी सणाचा आज देशभरात उत्साह, नागपुरात रेशीमबागेत संघाचं पथसंचलन सुरू; तर दीक्षाभूमीवर धम्मचक्र प्रवर्तनदिन सोहळा आणि
4. केरळमध्ये अतिवृष्टीचा इशारा, पाच जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट जारी

**<u>पंतप्रधान</u>**

हिंद-प्रशांत महासागर क्षेत्राचा विकास आणि शांतता यासाठी इथल्या सर्व देशांनी मुक्त, सर्वसमावेशक, विकासानुकूल असणं आणि नियमांचं पालन करणं गरजेचं आहे असं ठाम प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 19 व्या पूर्व आशियाई देशांच्या शिखर परिषदेत केलं. संपूर्ण हिंद प्रशांत क्षेत्रासाठी दक्षिण चीन समुद्रात शांतता, सुरक्षा आणि स्थैर्य कायम असणं महत्त्वाचं आहे या मुद्द्यावरही पंतप्रधान मोदी यांनी आपल्या भाषणात भर दिला. जगात विविध देशांमध्ये सुरू असलेल्या संघर्षाबाबत चिंता व्यक्त करताना सर्वांचाच दृष्टीकोन विस्तारवादाचा नाही तर विकासाचा असला पाहिजे असं मत त्यांनी व्यक्त केलं. परस्परांमधील समस्यांवर युद्धभूमीवर तोडगा निघू शकत नाही या आपल्या मताचा त्यांनी पुनरुच्चार केला. शांततेसाठीच्या प्रयत्नांमध्ये सर्व प्रकारची मदत करणं भारत यापुढेही सुरूच ठेवेल असं पंतप्रधान मोदी यांनी सांगितलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत काल भारत आणि लाओ यांच्यात सहा सामंजस्य करार करण्यात आले. दोन दिवसांच्या लाओ दौऱ्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी काल संध्याकाळी मायदेशी परतले.

**<u>आयकर संकलन</u>**

प्राप्तीकर विभागाकडे, 2024-25 या आर्थिक वर्षात आत्तापर्यंत प्रत्यक्ष करापोटी 13 लाख 57 हजार कोटी रुपयांहून अधिक कर जमा झाला आहे. यामध्ये सात लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक वैयक्तिक कर तर सहा लाख कोटींहून अधिक व्यावसायिक कराचा समावेश आहे. तसंच आयकर विभागाकडून दोन लाख 31 हजार कोटी रुपयांचा परतावाही जारी करण्यात आला आहे. निव्वळ प्रत्यक्ष कर संकलनात 18 टक्क्यांहून अधिक वाढ नोंदवण्यात आली आहे.

**<u>सूर्य घर पीएम</u>**

नूतन आणि नवीकरणीय उर्जा मंत्रालयानं, पीएम सूर्या घर मोफत वीज योजनेअंतर्गत नाविन्यपूर्ण प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक तत्व जारी केली आहे. या योजनांच्या घटकांमध्ये नाविन्यपूर्ण प्रकल्पांतर्गत, छतावरील प्रगत सौरउर्जा तंत्रज्ञान, व्यावसायिक प्रारूप आणि एकात्मिक तंत्रज्ञानातल्या

प्रगतीला प्रोत्साहन देण्यासाठी पाचशे कोटी रुपये राखून ठेवले आहेत. योजनेच्या घटकांतर्गत, इलेक्ट्रॉनिक वाहने, बॅटरी स्टोरेजसह छतावरील सौरउर्जा सारख्या उदयोन्मुख स्टार्टअप, संस्था आणि उद्योगांना नव्या संकल्पना राबवण्यास सहाय्य करण्याचा उद्देश आहे. यासाठी नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सोलर एनर्जी अंमलबजावणी संस्था म्हणून काम करेल. निवड झालेल्या प्रकल्पांना खर्चाच्या 60 टक्के किंवा 30 कोटी रुपये यापैकी जे कमी असेल ते अर्थसहाय्य मिळेल.

**पियुष गोयल**

भारत आणि युरोप यांच्यातल्या व्यापारात परस्पर सामंजस्य आणि सहकार्यामुळे वेगानं वृद्धी होऊ शकते असे वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी म्हटलं आहे. काल नवी दिल्ली इथं फेडरेशन ऑफ युरोपियन बिझनेस इन इंडिया च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. जग, प्रतिकाराच्या तत्वावर नव्हे तर परस्पर सहकार्यातून उपाय शोधण्याची गरज असल्याचं नमूद करून युरोपियन युनियनची धोरणे आणि जंगलतोडीशी संबंधित नियम कार्बन बॉर्डर ॲडजेस्टमेंट मेकॅनिझम सारख्या कृतींचा भारतीय उद्योग परिणाम झाल्याचं गोयल म्हणाले.

**दसरा**

चांगल्याचा वाईट प्रवृत्तीवर विजयाचा दिवस, प्रभू श्रीरामाचा रावणावर विजयाचा दिवस म्हणून आज विजयादशमीचा उत्सव आज देशभर साजरा केला जातो आहे. या निमित्तानं राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी नागरिकांना विजयादशमीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. श्रद्धा आणि आशेचा हा सण सर्वांसाठी यश, समृद्धी आणि आनंद घेऊन येईल अशी आशाही राष्ट्रपतींनी व्यक्त केली आहे.

**दसरा-आरएसएस**

विजयादशमीच्या निमित्तानं महाराष्ट्रातल्या नागपूर इथल्या रेशीमबाग मैदानावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्यावतीनं आयोजित संचलनाला प्रारंभ झाला असून, भारतीय अवकाश संशोधन संस्था म्हणजेच इस्रो चे माजी अध्यक्ष के राधाकृष्णन मुख्य अतिथि म्हणून उपस्थित आहेत. सरसंघचालक मोहन भागवत यांच्या हस्ते शस्त्रपूजन झाल्यानंतर, संचलनाला सुरूवात झाली आहे. याप्रसंगी, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांसह अन्य मान्यवर तसंच संघस्वयंसेवक उपस्थित आहेत. नागपूरसह महाराष्ट्रातल्या विविध राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडून पथसंचलनाचे आयोजन करण्यात आलं आहे.

आज धम्मचक्र प्रवर्तन दिनही साजरा होत आहे. या निमित्त नागपूरमधल्या दीक्षाभूमीवर आज संध्याकाळी मुख्य कार्यक्रम होणार असून उत्तरप्रदेशमधल्या कुशीनगर भिक्षु संघाचे अध्यक्ष भदंत ए. ए. बी. ज्ञानेश्वर, महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाचे प्रणेते आकाश लामा आणि दीक्षाभूमीवरील बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. आजच्या दिवसासाठी अनुयायांसाठी रेल्वे विभागाकडून विशेष गाड्या चालवल्या जात आहेत.

**ओमर अब्दुल्ला**

नॅशनल कॉन्फरन्स पक्षाचे उपाध्यक्ष ओमर अब्दुल्ला यांनी काल जम्मू-काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांची भेट घेऊन सरकार स्थापनेचा दावा केला आहे. आपण नायब राज्यपालांना भेटून नवीन सरकारच्या शपथविधीची तारीख निश्चित करण्याची विनंती केली आहे, असं अब्दुल्ला यांनी भेटीनंतर

पत्रकारांशी बोलताना सांगितलं. नॅशनल कॉन्फरन्स पक्षाचे, काँग्रेस, सिपीआय-एम, आप आणि अन्य अपक्ष या आघाडी पक्षांसोबत, सरकार स्थापनेवरून कोणतेही मतभेद नाहीत असं ते पुढे म्हणाले. नॅशनल कॉन्फरन्स पक्षाने विधीमंडळ पक्षाचे नेते म्हणून ओमर अब्दुल्ला यांची निवड केली आहे.

**आफ्रिका-मंकीपॉक्स**

आफ्रिकेत मंकीपॉक्स आजारामुळे सुमारे एक हजारांहून जास्त लोक मृत्युमुखी पडले आहेत, तर लागण झालेल्यांची संख्या 38 हजारांहून जास्त आहे. शिन्हुआ वृत्तसंस्थेने दिलेल्या वृत्तानुसार, सोळा आफ्रिकन देशांमध्ये मंकीपॉक्स आजाराची प्रकरणे नोंदवण्यात आली आहेत. मंकीपॉक्स हा एक दुर्मिळ विषाणूजन्य रोग आहे. यांच्या संसर्गामुळे सामान्यतः ताप, पुरळ आणि लिम्फ नोड्स सुजतात. दरम्यान, युगांडाच्या मध्यवर्ती भागात या रोजाचा उद्रेक झाल्यामुळे ही वाढ रोखण्यासाठी, जागतिक आरोग्य संघटनेंन आपत्कालीन प्रतिसाद पथक पाठवलं आहे अशी माहिती युगांडाच्या आरोग्य अधिकाऱ्याने काल दिली.

**मैसूर-दरभंगा**

दक्षिण रेल्वेच्या मैसूर-दरभंगा एक्सप्रेस रेल्वेगाडी काल चेन्नईतल्या कावरपेट्टई इथं अपघातग्रस्त झाली. ही गाडी ट्रेन लूप लाईनमध्ये उभ्या असलेल्या मालगाडीला धडकल्याने तिचे 12-13 डबे रुळावरून घसरल्याची माहिती रेल्वे प्रशासनाकडून देण्यात आली आहे. चेन्नईतल्या पोनेरी इथून जात असताना गाडी ट्रेन लूप लाईनमध्ये घुसली होती. या अपघातात जीवितहानी झाली नसून 16 प्रवासी जखमी झाल्याची माहिती रेल्वे प्रशासनानं दिली आहे. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं. वैद्यकीय बचाव पथकं आणि मदत पथकं अपघातस्थळी रवाना झाली असून आपत्ती दलाचे तीस जवानही दाखल झाले आहेत. अपघातात, पार्सल व्हॅनला लागलेल्या आगीवर अग्निशमन दलानं नियंत्रण मिळवलं आहे. या घटनेमुळे, चेन्नई गुदूर गाडी थांबवण्यात आली असून, तिरूची-हावडा एक्सप्रेस, एर्नाकुलम- टाट नगर एक्सप्रेस आणि काकीनाडा धनबाद विशेष गाडी इतर मार्गाने वळवण्याचे प्रयत्न केले जात आहेत.

**त्रिची विमान**

शारजाहला जाणाऱ्या एअर इंडिया एक्सप्रेस विमानात काल बिघाड झाल्यानं हे विमान तिरुचिरापल्ली विमानतळावर आपत्कालीन परिस्थितीत उतरवावे लागले. विमानात 141 प्रवासी होते. नागरी विमान वाहातूक मंत्री राममोहन नायडू किंजरापू यांनी, प्रवाशांची सुरक्षेला सरकार सर्वोच्च प्राथमिकता देत असल्याचं प्रसिद्धीला दिलेल्या पत्रकात म्हटलं आहे. या विमानत हायड्रोलिक बिघाड झाल्यानं, वैमानिकानं सर्व सुरक्षा नियमांचे पालन करत विमान उतरवण्याचा निर्णय घेतल्याचं नागरी उड्डाण महासंचालनालयानं म्हटलं आहे. या प्रकरणाची सखोल तपासणी करण्याचे निर्देश महासंचालनालयानं दिले आहेत.

**न्यूझीलंड**

बंगळुरू इथं सुरू होणाऱ्या बुधवारपासून न्यूझीलंडविरूद्धच्या तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी पंधरा खेळाडूंच्या संघाची घोषणा केली आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने जाहीर केलेल्या संघाचे नेतृत्व रोहित शर्मा करणार असून, वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमरामची उपकर्णधारपदी निवड करण्यात आली आहे. मोहम्मद शमीची दुखापतीमुळे निवड करण्यात आलेली नाही. पहिला सामना बंगळुरूत बुधवारी 16 तारखेला, दुसरा सामना 24 ऑक्टोबरला पुण्यात तर अंतिम आणि तिसरी कसोटी मुंबईत वानखेडे स्टेडियमवर एक नोव्हेंबरला होणार आहे.

**<u>क्रिकेट</u>**

भारत आणि बांग्लादेश क्रिकेट संघादरम्यानचा, वीस षटकांचा तिसरा आणि मालिकेतील अंतिम सामना आज हैद्राबाद इथे खेळला जाणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार संध्याकाळी सात वाजता खेळायला सुरुवात होईल. या आधीचे दोन्ही सामने जिंकून भारताने मालिकेत 2-0 अशी विजयी आघाडी घेतली आहे.

**<u>पाऊस-केरळ</u>**

हवामान विभागाने आज केरळ राज्यासाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. राज्यातील तिरुवनंतपुरम, कोल्लम, कोट्टायम, एर्नाकुलम आणि थ्रीसुर या पाच जिल्ह्यांत अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. नदीकिनारी तसंच दरडप्रवण क्षेत्रात राहणाऱ्या नागरिकांनी सुरक्षित स्थळी जाण्याचा इशारा राज्य प्रतिसाद दलाने दिला आहे. कोट्टायम जिल्ह्यातील मणीमला नदी धोक्याच्या पातळीवरून वाहत असल्यामुळे तेथील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.